शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सांगली जिल्हयातील सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**महोदय/महोदया,**

भारत सरकार शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या अनुषंगाने सांगली जिल्हयामध्ये महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्जाबाबत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सांगली यांनी पाठविलेले जा.क्र.सआसकसां/भासशि/ विजाभज, विमाप्र/प्रलंबित अर्ज/२०१६-१७/५२७, सांगली, दि.०२/०२/२०१७ चे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केले आहे. त्यानुसार शिष्यवृत्ती अर्जाबाबतची प्रलंबीत कार्यवाही तात्काळ करून सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सांगली यांना कळविण्यात यावे.

कळावे,

आदेशान्वये,

I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/210
दि. 18 FEB 2017
प्रत - मा.सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सांगली यांना माहितीसाठी.

# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सांगली

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,जुना बुधगांव रोड,सांगली-416416
दुर.क्र. 0233-2374739 E-mail:acsangli2016@gmail.com

जा.क्र.सआसकसां/भाशिष्य/विजाभज,विमाप्र/प्रलंबित अर्ज/2016-17/ 527 सांगली दि02/02/2017

इ-मेलद्वारे

SHIVAJI UNIVERSITY
Vice Chancellor's Office
Date 8/2/2017
Inward No. 60
To Whom DBCUD.

प्रति,

मा.कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

**विषय**:-भारत सरकार शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना - सांगली जिल्हयातील महाविद्यालयस्तरावर प्रलंबित अर्जाबाबत...

**संदर्भ**:-शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मुंबई दि.1.11.2003

Affiliation/T-2.
Inward No. 6130
Date 09/02/17

**महोदय,**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदींनुसार केंद्र सरकार पुरस्कृत भारत सरकार शालांत परीक्षोत्तर योजना व राज्य सरकार पुरस्कृत शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतीपूर्ती योजना अनुसूचित जाती,विमुक्त जाती व भटक्या जमाती,इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यासाठी ऑनलाईन पध्दतीने राबवली जाते. मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण पुर्ण करणेकामी सहाय्य करणे हा या योजनेचा उददेश आहे. सदर योजनेंतर्गत विद्यार्थी ऑनलाईन अर्ज भरून अर्ज व इतर आवश्यक कागदपत्रे संबंधित महाविद्यालयाकडे सादर करतात. ऑनलाईन अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधित महाविद्यालयाकडून बी-स्टेटमेंटस व इतर आवश्यक कागदपत्रांसह या कार्यालयास ऑनलाईन पध्दतीने वर्ग करून हार्ड कॉपी सादर केली जाते व त्या आधारे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करून थेट त्यांच्या बँक खात्यावर वर्ग केली जाते.

सन 2016-17 मध्ये सांगली जिल्हयामध्ये 366 महाविद्यालयांतील 29420 विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरलेले आहेत. तथापि,आजमितीस सांगली जिल्हयामध्ये महाविद्यालय स्तरावर 13000 अर्ज प्रलंबित असून जिल्हास्तरावर अर्ज ऑनलाईन वर्ग केलेल्या बऱ्याच महाविद्यालयांनीही अर्जांची बी-स्टेटमेंटस व आवश्यक कागदपत्रे सादर केलेली नसलेने पुरशी आर्थिक तरतुद उपलब्ध असूनसुध्दा पात्र विद्यार्थ्यांना चालू आर्थिक वर्षात शिष्यवृत्ती मंजूर करण्यामध्ये अडचणी येत आहेत.

सांगली जिल्हयातील महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या वेळोवेळी बैठका घेउन सन 2015-16 व 16-17 चे प्रलंबित अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सादर करणेबाबत निर्देश दिलेले असूनसुध्दा



8 FEB 2017
3162
DBCUD 72

महाविद्यालयांकडून प्रलंबित अर्ज मोठया प्रमाणावर अप्राप्त आहेत. महाविद्यालय स्तरावर अर्ज प्रलंबित असलेल्या महाविद्यालयांची यादी सोबत सादर केलेली आहे.

चालू शैक्षणिक वर्ष संपणेस अल्प कालावधी शिल्लक असून शासन निर्णय दि.1.11.2003 नुसार अर्जधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेत देणेत आवश्यक आहे.

सांगली जिल्हयातील सर्व महाविद्यालयांना त्यांचे स्तरावरील प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज आवश्यक कागदपत्रांसह या कार्यालयास तात्काळ सादर करणेकरता आपले स्तरावरून सूचना निर्गमित होणेबाबत नम्र विनंती आहे.

आपला विश्वासू,

(सचिन कवले)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, सांगली

**प्रत माहितीस्तव सविनय सादर-मा.प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण,पुणे विभाग,पुणे.**

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण,सांगली